पिंपरीत सहा घुसखोर बांगलादेशी नागरिकांना अटक

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in  शुक्रवार दिनांक 25/07/२०२५  METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 164 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com





# महात्मा फुले वाडा भुसंपादनाची कामे गतीने पूर्ण करा - मंत्री छगन भुजबळ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : 'महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरण' म्हणून आरक्षित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून विस्तारीकरणाकरिता आरक्षित क्षेत्राच्या भुसंपादनाचे काम गतीने पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी निर्देश दिले.

भिडेवाडा, महात्मा फुलेवाडा येथे भेट देवून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामकाजाबाबत माहिती घेतली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, उपायुक्त अविनाश संकपाळ, सहायक आयुक्त किसन दगडखैर, भूसंपादन उपायुक्त वसुंधरा बारवे, अधीक्षक अभियंता रोहिदास गव्हाणे, अधिक्षक अभियंता राजेश बनकर आदी उपस्थित होते.

भुजबळ म्हणाले, महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरणासाठी आवश्यक भूसंपादन व इतर कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून शासनाकडून १०० कोटी रुपयांचा निधी महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या स्मारकालगतच्या आरक्षित क्षेत्राचे पुणे महानगरपालिकेच्यावतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे. स्मारकांचे काम करतांना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने केलेल्या सूचनाचा विचार करावा, असेही भुजबळ म्हणाले.

प्रारंभी भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या बांधकामाची पाहणी तसेच याठिकाणी बसविण्यात येणाऱ्या खिडक्यांबाबत माहिती घेवून स्मारकाची कामे दर्जेदार पद्धतीने करण्याच्या भुजबळ यांनी प्रशासनाला सूचना दिल्या.

चंद्रन म्हणाले, महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरणाकरिता महानगरपालिकेने स्मारकालगतच्या आरक्षित क्षेत्राअंतर्गत ११९ घरांक (सिटी सर्वे क्रमांक), ६२४ मालक, ३५८ भाडेकरु, गलिच्छ वस्ती निर्मूलनाअंतर्गत ३६ गाळ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे, भुसंपादनाच्या कामे गतीने पूर्ण करण्यात येईल, असेही चंद्रन म्हणाले.

# तंत्रज्ञानातील नवनवीन कौशल्य आत्मसात करण्याची गरज -आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : तंत्रज्ञानामध्ये वेगाने बदल होऊ लागले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन सारखे तंत्रज्ञान समजून घेऊन त्याचा योग्य वापर करण्याची गरज आहे. त्यासाठी तंत्रज्ञानातील नवनवीन कौशल्य युवकांनी आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. पिंपरी चिंचवड महापालिका त्या अनुषंगाने विविध उपक्रम राबवत आहे, असे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनने महत्त्वाच्या भागीदार संस्था व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने 'भविष्यकालीन तंत्रज्ञानातील कौशल्य संधी - कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि संरक्षण तंत्रज्ञान' या विषयावर निगडी येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृह येथे परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवाद मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते.

नव्या तंत्रज्ञान क्षेत्रांतील वाढत्या गरजांसाठी योग्य कौशल्य विकास आणि सहकार्याच्या माध्यमातून पूरक उपाय तयार करणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या परिसंवादात मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह म्हणाले, ' युवकांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याचे प्रमाण वाढण्याची गरज आहे. भारताच्या तंत्रज्ञान क्रांतीत एकही युवक मागे राहू नये, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका विविध उपक्रम राबवण्यास आगामी काळात प्रयत्नशील आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनच्या मुख्य कार्यक्रम अधिकारी अमृता बहुलेकर यांनी संस्थेचा व्यापक दृष्टिकोन मांडताना, युवकांसाठी चालविण्यात येणारे कौशल्यविकास कार्यक्रम तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीशी सुसंगत करण्याची तातडीची गरज अधोरेखित केली. संस्थेचे सहसंस्थापक व अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन यांनी भारतातील भविष्यकालीन कामगार बाजारपेठेचे दृश्य मांडताना सांगितले की, '२०२७ पर्यंत भारताला १२.५ लाख कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञांची, दरवर्षी १ लाख प्रमाणित ड्रोन ऑपरेटर आणि जवळपास १० लाख सायबर सिक्युरिटी तज्ज्ञांची गरज भासणार आहे. ऑटोमेशनमुळे ३० टक्के एंट्री लेव्हल आयटी नोकऱ्यांवर परिणाम होणार असला, तरी एआय आधारित भूमिकांमध्ये १.६ पट वाढ होत आहे. दहावी उत्तीर्ण युवकांसाठी डेटा ॲनोटेशन आणि ड्रोन पायलटिंगसारख्या संधी निर्माण होत असून, पदवीधरांसाठी डेटा ॲनालिस्ट व ड्रोन टेक्निशियनसारखी नवीन पदे खुली होत आहेत.'

संस्थेच्या अध्यक्षा व सहसंस्थापक रुची माथूर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनुजा किशोर यांनीही कार्यक्रमात उपस्थित राहून सर्व युवकांसाठी समावेशक कौशल्यविकास आणि सार्वजनिक, खासगी भागीदारी मजबूत करण्याच्या फाउंडेशनच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनीही उपस्थित राहून युवकांसाठी कौशल्यविकास आणि तंत्रज्ञान समाकलनासाठी संस्थात्मक पाठिंबा दर्शवला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 25/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पतीची गळफास घेऊन आत्महत्या ; पत्नीचा मृतदेह आढळला

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड: सांगवीमध्ये पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली असून पत्नी मृत अवस्थेत आढळली आहे. नेमकं पतीने पत्नीची हत्या करून स्वतः आत्महत्या केली का? यासंबंधी पोलीस तपास करत आहेत. ही घटना आज सकाळी साडेनऊ च्या सुमारास उघड झाली. शाम वाघेला वय-५० असं आत्महत्या केलेल्या व्यक्तीच नाव आहे.




राजेश्री शाम वाघेला वय- ४५ या मृतावस्थेत आढळल्या आहेत. त्यांच्या तोंडातून रक्तस्राव झाल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितल आहे. शाम वाघेला हे आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर नेहमी संशय घ्यायचे. रात्री त्यांच्यात याच कारणावरून जोरदार वाद झाले होते. वाघेला यांच्या पत्नी राजश्री यांनी मुलीला फोन लावून याबाबत माहिती दिली होती. उद्या सकाळी येऊन भेटते अस मुलीने सांगितलं होतं. आज सकाळी मुलगी सांगवी येथील घरी गेल्यानंतर दरवाजा ठोठावून आतून प्रतिसाद मिळाला नाही. घाबरलेल्या मुलीने इतर नातेवाईकांना बोलवून पुन्हा दरवाजा ठोठावला. अखेर दरवाजा तोडण्यात आला. तेव्हा समोर विदारक चित्र दिसलं. वडिलांनी गळफास घेतलेला तर आई मृतावस्थेत आढळली.

या घटनेमुळे विवाहित मुलीवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वाघेला यांना दोन मुली असून दोघींचा विवाह झालेला आहे. पती पत्नी दोघेच राहत होते. शाम वाघेला यांची पत्नी राजेश्री वाघेला या पिंपरीत शिक्षिका आहे.

शाम वाघेला स्वतः रियल इस्टेट चा व्यवसाय करतात. शाम वाघेला यांनी पत्नीची हत्या करून आत्महत्या केली आहे का? या दिशेने पोलीस तपास करत आहेत.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचा भव्य सोहळा पिंपरीत थाटात संपन्न

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राष्ट्रीय श्रमिक आघाडी (महाराष्ट्र राज्य) अध्यक्ष यशवंतभाऊ भोसले यांच्या संयोजनाखाली तसेच भारतीय जनता पार्टीचे पिंपरी- चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्नजी काटे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त (दि.२२ जुलै) आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर, पिंपरी येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरोग्यावरील मार्गदर्शनासह ९४१ घरांच्या पुनर्विकासाची टेंडर प्रकिया जाहीर करण्यात आली.**



या कार्यक्रमाला खासदार अमर साबळे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य सदाशिवराव खाडे, मंगेश धाडगे, महेंद्र बाविस्कर, दिनेश पाटील, दीपक पाटील, दत्तात्रय गायकवाड, राहुल शितोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंतभाऊ भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना मंचावरून जाहीरपणे वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शुभेच्छा देताना त्यांनी दोन्ही नेत्यांचे महाराष्ट्राच्या विकासातले योगदान अधोरेखित करत, त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यात विविध पातळ्यांवर सकारात्मक बदल घडून आल्याचे नमूद केले. भोसले यांनी त्यांच्या भाषणात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना “लोकनेते” आणि “प्रेरणादायी नेतृत्व” म्हणून गौरविले.त्यांनी असेही म्हटले की, “राज्याच्या प्रगतीसाठी ज्या प्रकारे या दोन्ही नेत्यांनी समन्वय साधून काम केले आहे, ते खऱ्या अर्थाने अनुकरणीय आहे. आम्हा सर्व नागरिकांचे हित लक्षात घेतले जात आहे ही मोठी बाब आहे. येणाऱ्या काळात कामगार हिताचे निर्णय दोघेही घेतील अश्या अपेक्षा व्यक्त केल्या.”अखेर त्यांनी त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यशस्वी राजकीय कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमामध्ये “आरोग्यावर बोलू काही” या विषयावर विख्यात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. नरेंद्र वैद्य यांनी मोठ्या स्क्रीनवरून आरोग्य, आहार आणि व्यायामाबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांधेदुखी, मणक्याचे आजार, हाडांची कमकुवतता यावर उपाय सुचवले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात संत तुकाराम नगर गृहनिर्माण सहकारी गृह रचना संस्था मर्यादित या सोसायटीच्या ९४१ घरांच्या रिडेव्हलपमेंट प्रकल्पाचे टेंडर जाहीर करण्यात आले.

अध्यक्ष श्री यशवंतभाऊ भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सर्व सोयी-सुविधांसह नियोजित व्हिडीओ दाखवण्यात आला.या व्हिडिओची संकल्पना देखील यशवंतभाऊ भोसले यांची होती.

प्रकल्पाचे टेंडर श्री पुष्कराज भांबरे (आर्किटेक्ट) यांनी वाचून दाखवले. सर्व सभासदांनी बहुमताने या टेंडरला संमती दिली. मंचावर सोसायटीचे ४१ कार्यकारिणी सदस्यही उपस्थित होते.संपूर्ण सभागृहात टाळ्यांच्या गजरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाची प्रस्तावना यशवंतभाऊ भोसले यांनी तर शंकरराव शितोळे यांनी आभारप्रदर्शन केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : स्पर्धेच्या युगामध्ये युवक-पदवीधरांना नोकरीच्या संधींसाठी प्रचंड संघर्ष करावा लागत आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून आयोजित केलेल्या रोजगार व मार्गदर्शन मेळाव्यात एकाच दिवसात तब्बल ४२६ पदवीधरांना 'ऑन दी स्पॉट ऑफर लेटर' मिळाले. त्यामुळे पदवीधर उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंद पहायला मिळाला.



महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष योगेश बहल, मा.नगरसेवक अजित गव्हाणे, मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, राहुल भोसले, प्रशांत शितोळे, शाम लांडे, फजल शेख, संजय वाबळे, वसंत बोराटे, अनुराधा गोफणे, जितेंद्र ननावरे, प्रकाश सोमवंशी, विजय लोखंडे, ज्ञानेश्वर कांबळे, मायला खत्री, बबन गाढवे, शेखर काटे, वर्षा जगताप, चेतन दुधाळ, अक्षय माच्छरे, कविता खराडे, उज्वला ढोरे, मनीषा गटकळ, ज्योती गोफणे, शोभा पगारे, महेश झपके, संजय अवसरमल, श्रीकांत कदम, रवींद्र ओव्हाळ, गोरोबा गुजर, अकबर मुल्ला, रशीद सय्यद, देविदास गोफणे, संपत पाचुंदकर, भरत खरात, शकूला पठाण, माऊली मोरे, सतीश लांडगे, युवराज पवार, किरण ढेरे, रोहित कोळेकर, राहुल आडकर, वर्षा शिंदे आदि उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) च्या वतीने राज्याचे नेते तसेच महाराष्ट्र राज्याचे लाडके उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शहर विविधकार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.संत तुकारामनगर, पिंपरी येथे हॅप्पी स्ट्रीट -झुंबा कार्यक्रमाचे आयोजन दि.१३ जुलै २०२५ रोजी करण्यात आले होते, या कार्यक्रमामध्ये बालक, युवक युवती, तरूणांचा, जेष्ठ नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद दिला

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे प्राथमिक शाळा, संत तुकारामनगर येथे आदरणीय अजितदादा पवार तसेच योगेश बहल यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे यांनी शालेय साहित्य वही वाटप तसेच शिक्षक सेवकांचा सन्मानाचा करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे लाडके उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त चिंचवड मतदार संघात १) पिंपळे सौदागर येथील शंभो महादेव मंदीरात नाना काटे सोशल फाउंडेशन व उमेश काटे युथ फाउंडेशन च्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, येथे १५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. २) नवी सांगवी, पिंपळे गुरव परिसरामध्ये शराध्यक्ष योगेश बहल, मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थायी समिति मा.अध्यक्ष प्रशांत शितोळे, अतुल शितोळे, राजेंद्र जगताप, शाम जगताप, तानाजी जवळकर, सुषमा तनपुरे, उज्वला ढोरे, तृप्ती जवळकर, यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळे गुरव, नवी सांगवी परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ७२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# पिंपरीत सहा घुसखोर बांगलादेशी नागरिकांना अटक

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट-४ च्या पथकाने मोठी कारवाई करत अनधिकृतपणे भारतात घुसखोरी करून राहत असलेल्या ६ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांच्या मूळ देशात हद्दपार केले आहे. ही कारवाई २२ जुलै २०२५ रोजी करण्यात आली.**




पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे (भा.पो.से.) यांनी अनधिकृत विदेशी नागरिकांविरोधात कारवाईचे आदेश दिल्यानंतर, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) विशाल हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार (गुन्हे शाखा युनिट-४) व त्यांच्या पथकाने मुजबळ चौक, वाकड येथे सापळा रचून ही कारवाई केली.

ताब्यात घेतलेल्या व्यक्तींमध्ये मोहम्मद उस्मान शेख, अब्दुला शागर मुल्ला, मोबिन शेख, जाहांगिर मुल्ला, मोहम्मद इलाहीन बिश्वास आणि तोहिद हसन शेख यांचा समावेश आहे. चौकशीत त्यांच्या कडे भारतीय नागरिकत्वाचे कोणतेही वैध कागद नसल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत गुन्हे शाखा युनिट-४ चे पो.उ.नि. मयुरेश साळुंखे, संजय गवारे, पो.ह.वा. तुषार शेटे, कृणाल शिंदे, सुरेश जायभाये, भाऊसाहेब राठोड, शिवराम भोपे, पो.शि. प्रशांत सैद, गोविंद चव्हाण, सुखदेव गावंडे, अमर राणे, दिनकर आडे, अभिषेक मांडे, मोहम्मद गौस नदाफ, नितीन ढोरजे, मपोशि शवाना सय्यद तसेच विशेष शाखेचे लांडगे, राऊत (ए.टी.बी.), महिला पो.उ.नि. पवारा, पो.उ.नि. भरत माने (वाकड पो.ठा.) आणि तांत्रिक विश्लेषणासाठी पो.ह.वा. माळी, ननावरे, पो.शि. हुलगे, कारके यांनी सहभाग घेतला.

ही कारवाई शिताफीने पार पाडत पिंपरी-चिंचवड पोलिसांनी परदेशी घुसखोरीच्या विरोधात निर्णायक पावले उचलली असून, यामुळे अन्य अनधिकृत नागरिकांवरही नियंत्रण मिळविण्यास मदत होणार आहे.

# माजी उपमहापौर मोहम्मद भाई पानसरे यांच्यावतीने वृक्षारोपण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविले गेले यामध्ये प्रामुख्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर मोहम्मद भाई पानसरे व माजी नगरसेविका अमिना चाची पानसरे यांच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर वृक्षारोपण कार्यक्रम एच.ए. शाळेच्या मैदानात करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक,एकनाथ भुरसे सर, शाळेचे पदाधिकारी सरचिटणीस, विजय पाटील, गोपीनाथ शेळके, बाळासाहेब जाधव, पंडित पवार, उमेश कुलकर्णी, संपत पाचुणकर रमेश गडवे शाळेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांनी तसेच माजी उपमहापौर मोहम्मद भाई पानसरे व अमीना चाची पानसरे यांनी आपापल्या मनोगताद्वारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



# रहाटणीतील प्राथमिक शाळेला नवीन इमारत बांधावी, देविदास तांबे यांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड : रहाटणी मधील प्रभाग क्रमांक 27 मधील असलेल्या महानगरपालिका वतीने चालविण्यात येणारी प्राथमिक शाळा या शाळेच्या करिता नवीन इमारत बांधावी अशी मागणी माजी सरपंच श्री. गोविंदराव तांबे चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष देविदास उर्फ आप्पा तांबे यांनी केली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्याकडे सदर मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

आपल्या निवेदनात देविदास तांबे यांनी नमूद केले आहे की, रहाटणी परिसरा मध्ये महानगरपालिकेची जी प्राथमिक शाळा आहे त्या शाळेला नवीन इमारतीची गरज आहे. सध्याच्या शाळेची इमारत ही दोन मजली आहे परंतु या शाळेच्या इमारतीला 35, 40 वर्षे झाली आहेत, या शाळेत जवळपास अडीच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत परंतु त्यांना बसण्यासाठी पुरेसे वर्ग उपलब्ध नाही या शाळेला नढे कुटुंबांनी विना मोबदला जागा दान केली तसेच त्या शाळेच्या जवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा आहे. या ठिकाणी शिवजयंती मोठ्या प्रमाणात होत असते, भविष्यात ही जागा कमी पडणार आहे. सदर शाळे करिता सर्वे नंबर 44 मध्ये जी जागा उपलब्ध आहेत त्या ठिकाणी नवीन इमारत करावी व जुन्या शाळेच्या ठिकाणी त्या शाळेचे मैदान करावे अशी मागणी देविदास तांबे यांनी केली आहे.

तसेच शिवजयंतीच्या वेळी आयोजित कार्यक्रमांना भविष्यकाळात जागा कमी पडणार नाही मोठ्या प्रमाणात शिवजयंती उत्सव साजरा होईल व शाळेलाही मैदान उपलब्ध होईल त्यामुळे लवकरात लवकर शाळेची नवीन इमारत बांधावी अशी मागणी देविदास तांबे यांनी केली आहे.

# पिंपरी चिंचवड शहरात एकदाही कर न भरलेले 34 हजार 22 मालमत्ताधारक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शहरात ज्या निवासी किंवा बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडे थकबाकी आहे, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाई करण्यास सुरुवात करणार आहे. शहरात ७ लाख ३१ हजार मिळकतींची नोंद आहे. त्यापैकी आतापर्यंत ४ लाख २६ हजार मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच, आतापर्यंत एकदाही मालमत्ता कर न भरलेली ३४ हजार २२ इतकी संख्या असून, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाईस सुरुवात करणार असल्याचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.महापालिकेने पहिल्या तिमाहीत ५२२ कोटींचे कर वसूल करून विक्रम केला आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कर संकलनाचे



कामकाज सुरू आहे.मालमत्ता बिलासोबत थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस देऊनही वारंवार मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर महापालिकेने कठोर पावलं उचलली आहेत. कर न भरल्यास मालमत्ताही जप्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. तात्काळ कर न भरल्यास कारवाई अटळ असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील थकीत १ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्ताधारकांकडे ३१० कोटींचा थकीत कर आहे.

ज्या निवासी मालमत्ताधारकांकडे ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून थकबाकी आहे, अशा निवासी मालमत्तांची जंगम मालमत्ता म्हणजे कार, टीव्ही, फ्रिज व घरातील महागड्या वस्तू जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या मार्फत करण्यात येणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968